# प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.२९.०५.२०२४.

**रविंद्र काशीनाथ पाटील, तलाठी सजा विटनेर ता.चोपडा जि.जळगांव यांनी ५०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत**

—————0000000—————

यातील तक्रारदार यांचे सासऱ्याचे नावाने पंतप्रधान आवास योजना अंतर्गत घरकुल मंजुर झालेले होते. घरकुलचे बांधकामासाठी रेतीची आवश्यकता असल्याने वाळु ट्रक्टरचे वाहतुकीसाठी यातील आलोसे यांनी तक्रारदार कडेस १००००/— रु.लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि.जळगांव पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे रविंद्र काशीनाथ पाटील, तलाठी सजा विटनेर ता.चोपडा जि.जळगांव यांनी तक्रारदार यांचे कडे १००००/— रु.ची मागणी केली व तडजोडअंती ५०००/— रु.लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि.२८.०५.२०२४ रोजी विटनेर गावाचा कमानी जवळ रोडवर सार्व. जागी स्विकारल्याने त्यांचे विरुध्द चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशन जि.जळगांव गुरंन ८२/२०२४ भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दिनांक २८.०५.२०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.श्रीमती शर्मिष्ठा घारगे—वालावलकर,पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री.माधव रेड्डी,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री.सुहास डी.देशमुख पोलीस उपअधिक्षक ला.प्र.वि.जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.अमोल वालझाडे,पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. जळगांव करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दुरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यसाठी लॅडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्रि नंबर १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबधी व करावयाच्या तक्रारीसंबधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | १०६४ |
| २ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | १०६४ |
| ३ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२—२३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४—२३०००९ | १०६४ |

(पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव — शिक्का)

सुहास द.देशमुख
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव